मंत्रालय, मुंबई
[र. व का. विभाग]

# अधिसूचना

क्रमांक बीसीए-२००८/प्र.क्र.२०६/कामगार-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १६/०४/२००८

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ च्या नियम २ नुसार क्र.(एफ) (जी) व (एच) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन बांधकामाकरिता रकाना २ मध्ये दाखविलेल्या आस्थापनांकरिता त्यांच्यासमोर दर्शविलेल्या रकाना ३ मध्ये उपकर वसुली करण्याकरिता वसुली अधिकारी व रकाना ४ मध्ये दर्शविलेल्या निर्धारण अधिकारी तसेच रकाना ५ मध्ये दर्शविलेल्या अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती करीत आहे:-

| अ.क्र. | आस्थापना | वसुली अधिकारी | निर्धारण अधिकारी (राजपत्रित अधिकारी) | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | शासकीय इमारत व इतर बांधकाम कामाकरिता | उपअभियंता (सार्वजनिक बांधकाम) | कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) | अधिक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम) |
| २. | सार्वजनिक उपक्रमाच्या इमारत व इतर बांधकामाकरिता | कार्यकारी अभियंता (संबंधित सार्वजनिक उपक्रम) | सहसंचालक /अतिरिक्त संचालक/ महाव्यवस्थापक (संबंधित सार्वजनिक उपक्रम) | संचालक (संबंधित सार्वजनिक उपक्रम) |
| ३. | ज्या बांधकामास महापालिकेची मंजूरी आवश्यक आहे त्याकरिता | सहाय्यक महानगरपालिका आयुक्त/वॉर्ड ऑफिसर | महानगरपालिका उप आयुक्त | महानगरपालिका आयुक्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | ज्या बांधकामास नगर परिषदेची मंजूरी आवश्यक आहे त्याकरिता | कर निरिक्षक नगर परिषद | मुख्य अधिकारी नगर परिषद | नगरपरिषद उपजिल्हाधिकारी क्षेत्राचे कार्यभार असलेले |
| ५. | ज्या बांधकामा करिता ग्रामपंचायतीची मंजूरी आवश्यक आहे त्याकरिता | ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत | गटविकास अधिकारी पंचायत समिती | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| ६. | उपरोक्त अ.क्र. १ ते ५ मध्ये समाविष्ट नसलेल्या इमारत व इतर बांधकामाच्या मंजूरीकरिता | तहसिलदार | उपविभागीय अधिकारी | जिल्हाधिकारी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार

(मनोहर बोरकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१ ला असाधारण आज दिनांक १६/४/२००८ मध्ये मुद्रित करण्यासाठी रवाना. १०० मुद्रित प्रती या विभागाकडे व २०० मुद्रित प्रती कामगार आयुक्त,मुंबई यांच्याकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदरची अधिसूचना असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी अनुमती दिली आहे. आदेशांचा इंग्रजी अनुवाद सोबत जोडला असून तो या आदेशाखालीच प्रकाशित करावा.

(मनोहर बोरकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

निर्गमित केले
16 APR 2008

३

१. मा. राज्यपाल महोदयांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
५. सर्व मंत्रालयीन विभाग (हे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणण्यात यावे.)
६. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग
७. सर्व विभागीय आयुक्त
८. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य , मुंबई
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व महानगरपालिका आयुक्त
१२. सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
१३. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद
१४. निवडनस्ती (कामगार-०७)